स्क्रीन रिडरचा बादशहा

सांज दैनिक बीड RNI : Regd.No.MAH/MAR/2010/43846

# वास्तव

भारतरत्न रतनजी टाटा यांच्या महान देशभक्तीला समर्पित

२० वर्षे

एडिटर इन चिफ- जितेंद्र सिरसाट

वास्तव ई पेपर वाचा

http://epaper.beedvastav.com
https://www.beedvastav.com

# जगात फालताड लोकांचीही अजिबात कमतरता नाही!!

# अत्यंत क्रूर कृत्य!! बालकाश्रमातील अल्पवयीन मुलांचे हातपाय बांधून केले लैंगिक अत्याचार

**पुणे : शहरात गुन्हेगारीच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होत असताना, आता एका बालकाश्रमातून माणुसकीला काळीमा फासणारी अत्यंत धक्कादायक घटना समोर आली आहे. वाघोली जवळील वाडे बोल्हाई येथील एका बालकाश्रमात चक्क शिपायानेच दोन अल्पवयीन मुलांवर लैंगिक अत्याचार केल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. या घटनेने पुणे हादरले असून, बालकांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी रमेश नावाचा शिपाई गेल्या अनेक महिन्यांपासून बालकाश्रमातील एका 10 वर्षीय आणि एका 11 वर्षीय मुलावर लैंगिक अत्याचार करत होता.**



## मुलांवर अत्याचार करताना मुलांचे हातपाय बांधून ठेवल्याचे, तर काही वेळा त्यांच्या तोंडात बोळा कोंबल्याचेही आले समोर

- **गेल्या अनेक महिन्यांपासून बालकाश्रमातील एका 10 वर्षीय आणि एका 11 वर्षीय मुलावर लैंगिक अत्याचार**
- **जीवे मारण्याची धमकीही तो मुलांना देत होता. या क्रूर कृत्यामुळे दोन्ही चिमुकले भीतीच्या सावटाखाली होते!!**
- **आदिवासी ग्रामीण विकास प्रतिष्ठान संचलित व्यवस्थापकांने तात्काळ पोलिसांत धाव घेत केली तक्रार दाखल**

### नेमके प्रकरण काय?

वाघोलीजवळील वाडेबोल्हाई परिसरातील बालक आश्रमातील एका शिपायाने दोन मुलांवर अत्याचार करताना मुलांचे हातपाय बांधून ठेवल्याचे, तर काही वेळा त्यांच्या तोंडात बोळा कोंबल्याचेही समोर आले आहे. एवढेच नाही तर, जर कोणाला काही सांगितले, तर जीवे मारण्याची धमकीही तो मुलांना देत होता. या क्रूर कृत्यामुळे दोन्ही चिमुकले भीतीच्या सावटाखाली होते.

### लोणीकंद पोलिसांकडून तपास सुरू

● या प्रकरणाची गंभीर दखल घेत, सह्याद्री आदिवासी ग्रामीण विकास प्रतिष्ठानच्या संचित व्यवस्थापकांनी तात्काळ पोलिसांत धाव घेतली आणि आरोपीविरोधात तक्रार दाखल केली.

● व्यवस्थापकांना ही बाब कळताच त्यांनी जराही विलंब न लावता पोलिसांना माहिती दिली. सुरुवातीला घोडेगाव पोलिस ठाण्यात या शिपायाविरोधात 'पॉक्सो' कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. मात्र, आता हा गुन्हा लोणीकंद पोलिस ठाण्यात वर्ग करण्यात आला आहे.

● पोलिसांनी आरोपी रमेशला अटक केली असून, पुढील तपास सुरू आहे. या घटनेमुळे बालकाश्रमांमधील सुरक्षा व्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

## नणंदेच्या त्रासाला कंटाळून 6 वर्षीय मुलासह महिलेची पुण्यात आत्महत्या

● पुण्यातील आंबेगाव बुद्रुक परिसरात दळवीनगर येथे कल्पक सृष्टी सोसायटीमध्ये एका महिलेने 6 वर्षीय मुलासह इमारतीच्या टेरेसवरून उडी मारून आत्महत्या केल्याचा धक्कादायक प्रकार बुधवारी सायंकाळी 6 वाजेच्या सुमारास घडला.

● विष्णू शशिकांत देशमुख (6) आणि मयूरी देशमुख (31, मूळ गाव खामगाव, जिल्हा बुलडाणा) अशी मायलेकाची नावे आहेत.

● सदर टेरेसची पोलिसांनी पाहणी केली असता टेरेसवर सुसाइड नोट सापडली असून वहीमधील एका पानावर "नंणदेच्या त्रासाला कंटाळून मी हा निर्णय घेत आहे' असे लिहिले आहे.

## भिमनगरातील किराणा दुकानात चोरी, शहर पोलिसात गुन्हा दाखल

माजलगाव : शहरातील भिमनगर भागात प्रकाश हरिभाउ सावंत यांच्या मालकीच्या असलेल्या किराणा दुकानांत अज्ञात चोरट्यांनी चोरी केल्याची घटना घडली असुन या चोरीत हजारो रूपयांचे साहित्य चोरट्यांनी पळविले आहे.

याबाबत प्रकाश सावंत यांनी अज्ञात चोरट्यांविरूध्द दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, दि. १६ जुन रोजी किराणा दुकान बंद करून गेलो व दि. १५ जुन सकाळी दुकानाकडे गेलो असता दुकानाचा पत्रा उचकटलेला दिसला. आत जाउन पाहिले असता दुकानातील रोख रक्कम व इतर साहित्य चोरीला गेल्याचे दिसले. दि. १५ जुनच्या रात्री २ ते ५ वाजेच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी गल्यातील नगदी १५५० रूपये, थम्सअपच्या काही बाटल्या, बिस्कीट पुडे अंदाजे ११५० रूपये असा एकुण २७०० रूपयांचा मुद्देमाल चोरट्यांनी चोरला आहे. प्रकरणाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक राहुल सुर्यतळ हे करत आहेत.

## माजलगाव शहर पोलीसांचा जुगार आड्यावर छापा; आठ जण ताब्यात

माजलगाव / प्रतिनिधी : पोलीस ठाणे माजलगाव शहर हद्दीतील गौतमनगर भागात काल दि १८ जून रोजी काही इसम अवैद्यरीत्या जुगार खेळत आहेत अशी गोपीनय माहीती मीळाल्याने सदर ठिकाणी रात्री ८ :४० वा. सुमारास पोलीस स्टाफ व पंचासह छापा मारला असता आठ इसम रमी जुगार खेळत असताना मिळुन आले.

तसेच त्यांचे ताब्यात जुगाराचे साहीत्य व नगदी रुपय व मोबाईल असा एकुण ५०,८१० /- रुपयाचा मुद्देमाल मिळुन आल्याने सदर मुद्देमाल जप्त करुन आठ आरोपीतां विरुध्द पोस्टे गुरनं २२३/२०२५ कलम १२ ( अ ) म.जु.का. प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

सदरची कारवाई मा. नवनीत काँवत पोलीस अधिक्षक बीड, चेतना तीडके अपर पोलीस अधिक्षक आंबाजोगाई, उपविभागीय पोलीस अधिकारी उपविभाग आंबाजोगाई, यांचे



मार्गदर्शनाखाली राहुल सुर्यतळ पोलिस निरीक्षक पोलीस ठाणे माजलगाव शहर पोलीस उपनिरीक्षक संदिप राठोड, पोशि गवळी, पोशि मिरकले यांनी केली आहे.

## आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या कार्यक्रमास नागरिकांनी सहभागी व्हावे - प्रा. बरकसे

बीड / प्रतिनिधी : -भारत देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या आंतरराष्ट्रीय योगा दिन या उपक्रमाचे आयोजन गेवराईतील विविध ठिकाणी करण्यात आले आहे. या योगा दिन कार्यक्रमास गेवराई शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन पतंजली योग समितीचे अध्यक्ष प्रा. राजेंद्र बरकसे यांनी केले आहे.






जून २०१४ पासून सुरू झालेल्या योगा दिनाचा हा अकरावा आंतरराष्ट्रीय योग दिन जगभर व देशभर साजरा केला जातो. नागरिकांनी आरोग्य विषयाशी संबंधित उपक्रमात सतर्क रहावे आणि जीवनशैलीत सकारात्मक बदल करून आपले जीवन समृद्ध करावे या उद्देशाने सुरु असलेल्या या योग दिनाचा कार्यक्रम गेवराई शहरातील विविध ठिकाणी आयोजित करण्यात आला आहे. पहिला कार्यक्रम आर.बी. अट्टल कॉलेजच्या बॅडमिंटन हॉलमध्ये सकाळी ६ ते ७ या वेळेत होईल. त्यानंतर नरेंद्र महाराज प्रतिष्ठानच्या वतीने बाजार तळावरील महात्मा फुले सिटी सेंटर या इमारतीत सकाळी ७ ते ८ या वेळेमध्ये योग प्रशिक्षण होईल. त्याचबरोबर सकाळी ९ ते १० या वेळेत आर.के. पब्लिक स्कूल ॲण्ड ज्युनिअर कॉलेज तसेच ९.३० ते १० या वेळेत अभिनव इंग्लिश स्कूल, कोल्हेर रोड, गेवराई अशा विविध ठिकाणी योग दिनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. गेवराई शहरातील नागरिकांसाठी ही एक पर्वणीच आहे. शहरातीत सर्व कार्यालय प्रमुख, अधिकारी, कर्मचारी, शहरातील प्रतिष्ठित नागरिक स्त्री - पुरुष युवक - युवती, जेष्ठ नागरिक यांनी ज्या ज्या ठिकाणी शक्य असेल त्या ठिकाणी वेळेवर उपस्थित राहून योगा प्रशिक्षण व मार्गदर्शन उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन पतंजली योग समिती व रोटरी क्लबचे अध्यक्ष आणि महाराष्ट्र योग शिक्षक संघ आरोग्यवर्धिनी संस्थेचे राज्य कार्यकारणी सदस्य, ज्येष्ठ पत्रकार प्रा. राजेंद्र बरकसे यांनी केले आहे.

## सासू-सुनेच्या हस्ते 'आई तुझं लेकरू' पुस्तकाचे प्रकाशन

आष्टी प्रतिनिधी- कवी प्रा. सय्यद अल्लाउद्दीन यांच्या सौ. बेबीबानो आणि थोरली सून डॉ. मेहवश गौसिया या 'सासू-सुनेच्या' हस्ते कवी प्रा. सय्यद अल्लाउद्दीन यांच्या 'आई तुझं लेकरू' या पुस्तकाच्या तिसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन नुकतेच करण्यात आले. 'आई तुझं लेकरू' या पुस्तकाला सन 2007 सालचा महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट मराठी साहित्य निर्मिती राज्य पुरस्कार प्राप्त झालेला आहे.

'आई तुझं लेकरू' आणि 'आई माझी नातवांची आजी' या 'आई' या विषयावरील दोन पुस्तकांना बाल साहित्याचा राज्य पुरस्कार मिळवणारे कवी प्रा. सय्यद अल्लाउद्दीन हे बहुदा



एकमेव साहित्यिक ठरतील. त्याच बरोबर 'सासू-सुनेच्या' हस्ते पुस्तक प्रकाशन, मराठी साहित्य इतिहासात अनोखा आणि आगळावेगळा सोहळा ठरेल. या प्रकाशन सोहळ्याचे साक्षीदार म्हणून चिरंजीव डॉ. सय्यद डेंटल क्लिनिकचे डॉ. सय्यद हुमायुद्दीन हे उपस्थित होते.

## जिल्हा परिषद कन्या उर्दू शाळेला एक शिक्षिका त्याही दीर्घ रजेवर!




गेवराई : प्रतिनिधी गेवराई येथील जिल्हा परिषद कन्या उर्दू कनिष्ठ महाविद्यालयात शिक्षकांची तीन पदे रिक्त असून केवळ एका पर्यायी शिक्षकावर हे महाविद्यालय चालत आहे. परंतु त्या शिक्षकाचीही इतर ठिकाणी प्रतिनियुक्ती करण्यात आल्याने शिक्षकांअभावी विद्यार्थिनींचे शैक्षणिक नुकसान होत आहे शाळा सुरू होण्यापूर्वीच त्या ठिकाणी दोन शिक्षकांची पर्यायी व्यवस्था करण्यात येईल, असे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी सांगितले. जिल्हा परिषद कन्या उर्दू ही आठवी ते बारावी एकमेव बीड जिल्ह्यातील शाळा आहे पहिलेच ● पान ३ वर...

## फार्मसी: भविष्यातील अग्रणी नामांकित करिअरची संधी' - प्रा डॉ निखिल जाधव

माजलगाव / प्रतिनिधी : आपल्याला निरोगी ठेवण्यात आणि विविध रोगांवर उपचार करण्यात डॉक्टरांसोबतच फार्मासिस्टचीही मोठी भूमिका आहे. फार्मासिस्ट म्हणजेच औषधनिर्माता ही अशी व्यक्ती आहे ज्याला औषधांबद्दल संपूर्ण माहिती असते. भारतात औषधांची समृद्ध बाजारपेठ आहे उच्च दर्जाची औषधे उत्पादन करण्यात भारताचा जगात तिसरा क्रमांक लागतो. जगाला लागणारी ८० टक्के औषधे भारतात तयार होतात. अमेरिकेच्या



अन्न आणि औषध प्रशासन मान्यता प्राप्त कंपन्या अमेरिकेनंतर सर्वात जास्त भारतात आहेत. स्वस्त औषध निर्मितीमध्ये भारत अव्वल स्थानावर आहे. त्यामुळे जगाची फार्मसी म्हणून भारताची ओळख निर्माण झाली आहे.

आधुनिक औषधे अत्यंत प्रभावी, कमी मात्रेतही गुणकारी, त्वरित परिणाम करणारी पण घातक दुष्परिणामही असलेली. योग्यपणे वापरली तर अमृत, अन्यथा विषारी. आधुनिक तंत्रज्ञानामुळे ओषधांचेच प्रकारही ( डोसेज फॉर्मस ) ● पान ३ वर...

# वृषभ, सिंह, तूळ, कुंभ राशीसह इतर राशींसाठी आजचा दिवस कसा असेल, जाणून घ्या

## मेष रास

मेष राशीच्या लोकांसाठी उद्याचा दिवस गोंधळात टाकणारा असेल. तुम्हाला विनाकारण खूप धावपळ करावी लागेल, ज्यामुळे तुमचे मन अस्वस्थ होईल. काही काम पूर्ण न झाल्यामुळे तुम्ही निराश व्हाल, परंतु तुम्हाला तुमच्या बोलण्यात आणि वागण्यात संयम ठेवावा लागेल, अन्यथा समस्या उद्‌भवू शकते. जर तुमच्या मालमत्तेशी संबंधित कोणताही खटला न्यायालयात सुरू असेल तर उद्या या प्रकरणात तुमच्या बाजूने निकाल लागेल. तुम्ही तुमच्या विरोधकांवर विजय मिळवाल. राजकारणात काम करणाऱ्या लोकांना मोठे पद आणि आदर मिळू शकतो. जर कुटुंबात परस्पर मतभेद असतील तर ते सोडवले जाऊ शकतात.

## वृषभ रास

वृषभ राशीच्या लोकांसाठी उद्याचा दिवस आरोग्याच्या दृष्टीने कमकुवत राहणार आहे, म्हणून तुम्हाला तुमच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करणे टाळावे लागेल. तुम्ही नवीन व्यवसाय सुरू करू शकता, परंतु उद्या भागीदारीच्या कामात अडचणी येण्याची शक्यता आहे, म्हणून उद्यापासून भागीदारीचे काम सुरू करू नका. तुमचे मन एखाद्या गोष्टीबद्दल चिंतेत असेल. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांनी काही मोठ्या फसवणुकीपासून सावध राहण्याची गरज आहे. तुम्हाला भूतकाळातील काही चुकांमधून धडा घ्यावा लागेल आणि तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवावे लागेल. कामाच्या संदर्भात तुमचा प्रवास उद्या यशस्वी होईल.

## मिथुन रास

मिथुन राशीसाठी उद्याचा दिवस खूप शुभ राहणार आहे. तुम्हाला नवीन वाहन मिळू शकते. तुम्ही तुमच्या कुटुंबातील सदस्यांसह कोणत्याही शुभ समारंभात सहभागी होऊ शकता. मुलांशी तुमचा चांगला समन्वय असेल आणि तुम्ही त्यांच्या शिक्षणात त्यांना पाठिंबा द्याल. तुमच्यासाठी नवीन कामात गुंतवणूक करणे चांगले राहील. तुमच्या मनात असलेल्या समस्यांबद्दल तुम्ही वरिष्ठ सदस्यांशी बोलू शकता आणि त्यांच्याकडून तुम्हाला योग्य उपाय मिळतील. आईचा कोणताही जुना आजार पुन्हा उद्‌भवू शकतो ज्यामुळे त्रास होईल.

## कर्क रास

कर्क राशीच्या लोकांसाठी उद्याचा दिवस कायदेशीर बाबींमध्ये चांगला राहणार आहे. तुम्हाला उत्पन्नाचे नवीन स्रोत मिळतील. कुटुंबातील लोक तुमच्या शब्दांचा आदर करतील, ज्यामुळे तुम्ही समाधानी राहाल आणि काहीतरी खास करण्याची इच्छा प्रबळ राहील. उद्या तुम्ही तुमच्या कुटुंबाच्या आनंदासाठी काही भौतिक वस्तू खरेदी करू शकता. कोणत्याही अनोळखी व्यक्तीच्या प्रभावात येऊ नका, अन्यथा तो तुम्हाला फसवू शकतो.

## सिंह रास

सिंह राशीच्या लोकांसाठी उद्याचा दिवस अचानक लाभदायक असेल. पण उद्या गाडी चालवताना त्यांना काळजी घ्यावी लागेल कारण दुखापत आणि अपघात होण्याची शक्यता आहे. व्यवसायात कोणासोबतही भागीदारीत कोणताही करार करू नका, अन्यथा तुमची फसवणूक होऊ शकते, असा सल्ला दिला जातो. तुम्हाला एखाद्या गोष्टीची काळजी असेल.

## कन्या रास

कन्या राशीच्या लोकांसाठी उद्याचा दिवस तुमच्यासाठी थोडा गोंधळात टाकणारा असेल. मानसिक अस्वस्थतेमुळे तुम्हाला निर्णय घेण्यात अडचण येईल. परस्पर भांडणांमुळे कुटुंबातील वातावरण बिघडू शकते. तुमच्या मनात एखाद्या गोष्टीची भीती असेल, ज्यामुळे तुम्ही चिंतेत राहाल. उद्या एखाद्या स्पर्धेत यश मिळाल्याने विद्यार्थ्यांना आनंद होईल.

## तूळ रास

उद्या, सोमवार तूळ राशीसाठी फायदेशीर राहील आणि आदर वाढेल. तुम्हाला वाहनाचे सुख मिळेल, जे लोक वाहन खरेदी करण्याचा विचार करत आहेत त्यांच्यासाठी उद्याचा दिवस या बाबतीत अनुकूल असेल. कुटुंबातील एखाद्या सदस्याला तुम्ही बोललेल्या गोष्टीबद्दल वाईट वाटू शकते, ज्यामुळे तो रागावू शकतो. तुमच्या अभ्यासाशी संबंधित काही प्रकरणे सोडवली जात आहेत असे दिसते. खूप दिवसांनी जुना मित्र भेटून तुम्हाला आनंद होईल.

## वृश्चिक रास

वृश्चिक राशीचे राशीचे उद्या तुमच्यासाठी प्रगतीचा मार्ग मोकळा करेल. व्यवसायात नफा मिळाल्यानंतर तुम्ही आनंदी व्हाल. एखाद्याकडून ऐकलेल्या गोष्टीवरून वाद घालू नका, अन्यथा तुमचे नुकसान होऊ शकते. पैशाशी संबंधित कोणताही विषय तुम्हाला त्रास देऊ शकतो. आर्थिक बाबींमध्ये तुम्ही मित्रांकडून सल्ला घेऊ शकता परंतु इतर कोणाच्याही प्रभावाखाली कोणताही निर्णय घेऊ नका अन्यथा तुमचे नुकसान होऊ शकते. विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणाचा मार्ग मोकळा होईल.

## धनु रास

उद्याचा दिवस तुमच्यासाठी सामान्य असेल. तुम्हाला तुमच्या विरोधकांपासून सावध राहावे लागेल. अनावश्यक अडचणीत पडणे टाळावे आणि स्वत:च्या कामात लक्ष द्यावे. जर तुम्ही दुसऱ्यांच्या बाबतीत ढवळाढवळ केली तर तुम्ही अडचणीत येऊ शकता. जर तुमच्या तब्येतीत काही बिघाड झाला असेल तर उद्या ती सुधारेल. कुटुंबातील सदस्यांकडून अपेक्षित सहकार्य मिळू शकेल. एखादा जुना मित्र खूप दिवसांनी तुम्हाला भेटायला येऊ शकतो.

## मकर रास

उद्याचा दिवस तुमच्यासाठी गोंधळात टाकणारा असू शकतो. तुमचे मन एखाद्या गोष्टीबद्दल चिंतेत असेल. कुटुंबातील एखाद्या सदस्याकडून तुम्हाला काही चांगली बातमी ऐकायला मिळू शकते. उद्या तुम्ही तुमच्या कामाच्या व्यवसायात काही बदल कराल परंतु उद्या कोणतेही धोकादायक पाऊल उचलू नका. उद्या तुम्हाला तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल, अन्यथा तुमचा प्रियकर एखाद्या गोष्टीने नाराज होऊ शकतो. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

## कुंभ रास

कन्या राशीच्या लोकांसाठी उद्याचा दिवस चांगला राहणार आहे. व्यवसायात, तुम्हाला मागील योजनांमधून चांगले फायदे मिळू शकतात, ज्यामुळे तुम्हाला आनंद होईल. जर तुमचे कोणतेही प्रलंबित काम तुम्हाला बऱ्याच काळापासून त्रास देत असेल तर तेही पूर्ण होऊ शकते. जर तुम्हाला कोणत्याही शारीरिक समस्येमुळे त्रास झाला असेल तर तुम्हाला त्यातही आराम मिळत असल्याचे दिसून येते. विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या समस्यांबद्दल त्यांच्या शिक्षकांशी बोलावे लागू शकते. ज्येष्ठांचे मार्गदर्शन तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल.

## मीन रास

मीन राशीसाठी उद्याचा दिवस चैनीच्या वस्तूंमध्ये वाढ आणणारा आहे. तुम्ही तुमच्या आयुष्यात एक मोठा निर्णय घेऊ शकता आणि वरिष्ठ सदस्य तुमच्या बोलण्याने खूश होतील. तुमच्या जोडीदाराकडून तुम्हाला भेटवस्तू मिळू शकते. तुमच्या पालकांच्या आशीर्वादाने तुम्ही उद्या यशाकडे वाटचाल कराल. उद्या व्यवसायात तुमची कमाई चांगली असेल. नोकरी करणाऱ्या लोकांवर कामाचा ताण जास्त असेल, परंतु तरीही वरिष्ठांच्या मदतीने ते वेळेवर काम पूर्ण करतील. वैवाहिक जीवन तुमच्या जोडीदाराची तब्येत ठीक नसेल तर उद्या ती सुधारेल.

# दिवंगत अभिनेत्री रीमा लागू यांचे माजी पती विवेक लागू यांचे निधन, आज होणार अंत्यसंस्कार

ज्येष्ठ नाट्य अभिनेते विवेक लागू यांचे वयाच्या ७४ व्या वर्षी निधन झाले. दिवंगत अभिनेत्री रीमा लागू यांचे ते माजी पती होते. वृत्तानुसार, विवेक लागू यांनी (१९ जून २०२५) रोजी अखेरचा श्वास घेतला. विवेक लागू हे मराठी नाट्य जगतातील एक आदरणीय व्यक्तिमत्व होते आणि त्यांनी टेलिव्हिजन आणि चित्रपट सृष्टीतही आपले योगदान दिले. त्यांची माजी पत्नी रीमा लागू यांच्यासोबत अभिनय क्षेत्रात त्यांची चांगली कारकीर्द होती.

अनेक प्रसिद्ध मालिका आणि चित्रपटांमध्ये विवेक लागू यांनी काम केलं आहे. 'व्हॉट अबाऊट सावरकर', 'अग्ली', '31 दिवस' या चित्रपटांममध्ये त्यांनी काम केलं असून, 'चार दिवस सासूचे', 'हे मन बावरे' या गाजलेल्या मालिकांमध्येही त्यांनी काम केलं आहे.

### रीमा लागू यांचे माजी पती





१९७६ मध्ये बँकेत काम करत असताना रीमा लागू आणि विवेक लागू या दोघांची पहिली भेट झाली, रंगभूमीवरील त्यांच्या प्रेमामुळे ते एकत्र आले. १९७८ मध्ये त्यांचे लग्न झाले. पण काही काळानंतर त्यांचा घटस्फोट झाला. घटस्फोटानंतरही विवेक आणि रीमा एकमेकांबद्दल आदर राखत होते. विवेक आणि रीमा यांना मृण्मयी लागू वैकुल ही मुलगी आहे. मृण्मयीने कुटुंबाचा कलात्मक वारसा पुढे नेला आहे. लेखिका आणि दिग्दर्शिका म्हणून तिने थप्पड आणि स्कूप सारख्या उत्तम चित्रपटांसाठी काम केले आहे.

### अंतिम संस्कार कुठे केले जातील?

विवेक लागू हे मराठी चित्रपट आणि टीव्ही जगतात एक प्रसिद्ध नाव होतं. विवेकच्या मृत्यूची बातमी सर्वप्रथम विकी लालवाणी यांनी सोशल मीडियावर शेअर केली. विवेक लागू यांचे अंत्यसंस्कार आज, (शुक्रवार, 20 जून 2025) ओशिवरा स्मशानभूमीत केले जातील.

# मयुरीच्या आत्महत्येप्रकरणी मोठी अपडेट; लिपस्टिकने सुसाईट नोट लिहिली अन्...

पुणे : नणंदेच्या छळामुळे आपल्या सहा वर्षाच्या चिमुकल्यासह पाचव्या मजल्यावरून उडी मारून आत्महत्या केल्याप्रकरणी पोलिसांनी तत्काळ पतीला अटक केली. तर, नणंदेसह सासूवर गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पुण्यातील आंबेगाव बुद्रुक येथे ही घटना बुधवारी दळवीनगर येथील कल्पकसृष्टी या सोसायटीत घडली होती. दरम्यान, आत्महत्येपुर्वी तिने सुसाईड नोट लिहून नणंदेच्या त्रासामुळे मी हा निर्णय घेतल्याचे म्हंटले होते. सुसाईड नोट लिपिस्टीकने लिहीली होती.

याप्रकरणी पोलिसांनी पती शशिकांत त्रंबकराव देशमुख (वय ३३, रा.खामगाव) याला अटक केली आहे. तर सासू रमाबाई देशमुख (वय ६५), नणंद मेघा रविंद्र देशमुख (वय ३५) यांच्याविरुद्ध आंबेगाव बुद्रुक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. याबाबत मयुरीचा भाऊ सचिन प्रभाकर ढाकरे (वय २४) यांनी तक्रार दिली आहे. मयुरी शशिकांत देशमुख (वय ३१), विश्वजीत शशिकांत देशमुख (वय ६) अशी आत्महत्या केलेल्या माय-लेकांची नावे आहेत.

पोलिसांच्या माहितीनुसार, मयुरी व शशिकांत यांचा २०१८ मध्ये विवाह झाला होता.



विवाहानंतर मयुरीला सासरचे सतत टोमणे मारून बोलत होते. छोट्या-छोट्या गोष्टीतून अपमान करत होते. त्यामुळे मयुरी, तिचा लहान मुलगा व पती तिघे पुण्यात राहत होते. शशिकांत हा गाडी चालविण्याचे तर मयुरी नर्सरी शाळेत शिकवत होती.

मेघा भाऊ शशिकांत याला भडकावत असे, त्यातून तो संशय घेऊन मयुरीला मारहाण करत असे. तिनेही मयुरीला मारहाण केली होती. तिच्याकडे सासरचे लोकं पैशांची मागणी करत होते. त्यामुळे मयुरी माहेरी निघून गेली होती.

बुधवारी सकाळी मयुरी आणि तिचा तक्रारदार भाऊ सचिन हे दोघे सकाळी साडे आठच्या सुमारास पुण्यात पोहचले. मयुरीला पुण्यातून कोणतेतरी सर्टीफिकेट घ्यायचे होते. सचिन चाकण येथे सामान घेण्यास गेला, तर मयुरी आंबेगाव येथील फ्लॅटवर गेली होती. सायंकाळी सहाच्या सुमारास सचिन मयुरीच्या घरी पोहचला. घराला कुलूप होते. त्यामुळे तो खाली बाकड्यावर बसला. त्यावेळी त्याला वरून काहीतरी खाली पडल्याचा मोठा आवाज आला. त्याने पाहिले तेव्हा, त्याची बहीण व भाचा दोघे इमारतीच्या टेरीसवरून खाली पडल्याचे दिसले. त्यांना ससून रुग्णालयात नेले. मात्र, उपचारापुर्वीच दोघांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. हा प्रकार घडल्यानंतर सचिन यांनी आंबेगाव पोलिसात तक्रार दिली. त्यानुसार पोलिसांनी गुन्हा दाखल करून मयुरीच्या पतीला अटक केल्याचे वरिष्ठ निरीक्षक शरद झिने यांनी सांगितले.

# पूजा करताना पती पत्नी एकत्र का बसतात, काय आहे यामागील कारण

हिंदू धर्मामध्ये दाम्पत्याने एकत्र बसणे ही फक्त परंपराच नाही तर याला शास्त्रात अध्यात्मिक आणि सामाजिक महत्त्व देखील आहे. वैवाहिक जीवनात सुख समृद्धीच नाही तर आनंदाचे प्रतीक मानले जाते. विवाह हा केवळ दोन व्यक्तींचे मिलन नाही तर दोन आत्म्यांचे पवित्र बंधन मानले जाते. असे म्हटले जाते की, दाम्पत्याने एकत्र पूजा केली की, शक्ती आणि भक्ती एकत्रितपणे परिपूर्णता प्राप्त करतात. जर कोणीही एकट्याने पूजा केल्यास ती अपूर्ण मानली जाते.

मान्यतेनुसार, दोघांनी एकत्र केलेल्या पूजेचे पुण्य दुप्पट आणि समान प्रमाणात मिळते, असे मानले जाते. शास्त्रामध्ये उल्लेख केल्यानुसार, पतीने कधीही पत्नीशिवाय पूजा करू नये, कारण असे केल्याने पूजेचे पूर्ण फायदे मिळत नाहीत. हीच गोष्ट पत्नीलाही लागू होते.

### दोघांचे सहकार्य असते आवश्यक

हिंदू धर्मामध्ये स्त्रीला देवीचे रुप म्हणजेच दुर्गा, लक्ष्मी, सरस्वती यांचे रुप मानले जाते. तर पुरुषामध्ये शंकर, विष्णू यांचे रुप मानले जाते. म्हणून या शक्तींशिवाय कोणतीही कामे पूर्ण होत नाही, अशी मान्यता आहे. पूजा करतेवेळी एकत्र बसणे हे शिव आणि शक्ती यांच्यातील सुसंवादाचे प्रतीक मानले जाते. जसे भगवान शिवाच्या अर्धनारीश्वर रूपात आहे. असे म्हटले जाते की, जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात वळणावर खास करुन धार्मिक कार्य करताना पुरुष आणि स्त्री दोघांचेही सहकार्य, संतुलन असणे गरजेचे मानले जाते.



### दोघांमध्ये होणारे मतभेद

अशी मान्यता आहे की, दोघांनी एकत्र पूजा केल्याने अध्यात्मामध्ये असलेल्या बंधात वाढ होते. यामुळे नात्यामधील सुसंवाद, प्रेम आणि समजूतदारपणा वाढतो. एकत्र पूजा केल्याने दोघांमधील फरक कमी होऊन त्यांच्यामधील विश्वास वाढतो. यासोबतच त्यांच्यामधील एकमेंकाबद्दल असलेला आदर आणि सहकार्याची भावना व्यक्त देखील केली जाते.

### पूजेला बसताना स्त्रीया उजव्या बाजूला का बसतात

वैदिक परंपरेनुसार, कन्यादान, यज्ञ, हवन, नामकरण आणि अन्नप्रासन यासारख्या महत्त्वाच्या संस्कारांमध्ये पत्नीने पतीसोबत बसणे बंधनकारक आहे. यामधून दोघांमधील संयुक्त सहभाग आणि दोघांवर असलेली जबाबदारी दिसून येते. विशेषत: होमहवन, पूजा, यज्ञ, व्रत इत्यादी धार्मिक विधी करताना दोघांनी एकत्र करण्याची परंपरा आहे तसेच यावेळी पत्नीने पतीच्या उजव्या बाजूला बसण्याची प्रथा आहे. यामागे काही धार्मिक श्रद्धादेखील आहेत.

### पत्नीने पतीच्या डाव्या बाजूला कधी बसावे

धार्मिक मान्यतेनुसार, उजवी बाजू ही शक्ती आणि आईचे स्थान असलेले दर्शवते तर पत्नीला शक्तीचे रुप मानले जाते. दरम्यान जेवणे, झोपणे आणि वयस्कर व्यक्तीच्या किंवा वयाने मोठ्या असणाऱ्या लोकांच्या पायाला स्पर्श करुन आशीर्वाद घेणे यांसारख्या गोष्टींमध्ये पत्नीने पतीच्या डाव्या बाजूला बसणे शुभ मानले जाते. कारण डावी बाजू ही प्रेमाची आणि हृदयाचे प्रतीक असलेली मानली जाते.

(टीप: धर्म, ज्योतिष, वास्तु, फेंगशुई इत्यादी विषयांवरील लेख/बातम्या केवळ वाचकांच्या माहितीसाठी आहेत. यासंबंधी कोणताही प्रयोग करण्यापूर्वी तज्ज्ञांचा सल्ला आवश्यक आहे. आमचे उद्दिष्ट फक्त वाचकांना माहिती देणे आहे. आम्ही या तथ्यांची पुष्टी करू शकत नाही.)

# पं. हृषिकेश महाले व स्वरश्री यांची नवी गजल" साजन मोरे... "लाँच.. रसिकांचा तुफान प्रतिसाद..







साजनमोरे..या गजलचा लॉन्च 11 जुन 2025 रोजीलोणावळायेथेमोठ्याथाटामाटातपारपडला. सुप्रसिद्धगायिकावगीतकारस्वरश्रीयाचेअल्फाज, पं.हृषिकेशमहालेजींचसंगीतआणियाचदोघांनीगायलेलीगजल" साजनमोरे.." चअनावरणश्री. चंद्रकांतजोशीजी, गायकवआयोजकश्री. राजेशमेहता, सौ. उमा मेहताअशाखासमान्यवरांच्याहस्तेलॉंचझाली.

गजलचीगायकीवसंगीत, शब्दउपस्थितरसिकांनीठेकाधरूनपसंतकेली. आयोजकश्री. राजेशमेहतायांनीअसंप्रथमचलोणावळायेथेहोतअसल्याचेसांगितलंतसचसध्यानवीनगजलऐकायलामिलणदुर्लभअसूनपंडितजीनीदिलेलंसंगीतहे त्याभावनेलावाटकरूनदेतअसहीम्हंटल. संगीतअभ्यासकश्री. चंद्रकांतजोशीयांनीस्वरश्रीयांच्याअल्फाजाबद्दलकौतुककेलं. याप्रसंगीपंडितजींचामास्टरक्लास 2 चआयोजनहीकरण्यातआलंहोत..

लोणावळातीलगायकगायीकांनी masterclass 2 लाउदंडप्रतिसाददिला. जागाकमीपडलीबसायलारसिकांनाइतक्यामोठ्याप्रमाणातरसिकांचीगर्दीझालीहोती..

नंतरस्वरश्रीयांनीत्यांच्याचलिहिलेल्या" साजनमोरे.." यागजलविषयीअनेकपैलूगीतकारच्याभुमिकेतूनउलगडूनदाखवले. पं.हृषिकेशमहालेवस्वरश्रीयादोघांनीहीगजल LIVE स्वरूपातरसिकांनाऐकवलीवप्रचंडटाळ्यांच्याकडकडाटातदादमिळविली.

गजलच्यागाढाअभ्यासअसलेलेपं.हृषिकेशमहालेजींनीगजलगायकांनीकशीअभ्यासावीवपेशकरावीहेमास्टरक्लासमधूनशिकवलं. याप्रसंगीकथकनृत्यागनाअनन्याकुलकर्णीहीपणउपस्थितहोती. विशेषसाहाय्यकल्पेशमोघेयांनीके

सांज दैनिक बीड
वास्तव
सायं. दैनिक बीड वास्तव हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक जितेंद्र कान्होजीराव सिरसाट** शुभेच्छा प्रिंटिंग प्रेस एमआयडिसी. बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून बीड वास्तव ऑफिस बशीर गंज चौक, बीड ४३११२२ (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. **संपादक - जितेंद्र कान्होजीराव सिरसाट, निवासी संपादक -अरविंद ओव्हाळ** (या अंकामध्ये छापलेल्या मजकूराशी मालक संपादक प्रकाशक सहमत असतीलच असे नाही) (वाद-विवाद बीड न्याय कक्षेत) मो. 9022952922

# छत्रपती मल्टी स्टेट बॅंकेवर गुन्हा नोंद करण्याचे कोर्टाचे आदेश

गेवराई : प्रतिनिधी
येथील न्यायालयाने छत्रपती मल्टीस्टेट क्रेडिट सोसायटी लिमिटेड लि गेवराई या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष व तथा चेअरमन श्री संतोष बसंता भंडारी यांच्याविरुद्ध संस्थेतील खातेदार भागुजी धोंडीबा धुळगुंडे या खातेदाराचे बचत खात्यातील रक्कम रुपये 11 लाख 47 हजार एवढी रक्कम खातेदार यांची बॅंक खात्यामध्ये जमा होती



खातेदार यांनी बॅंकेचे मॅनेजर व बॅंकेचे संस्थापक चेअरमन यांना वेळोवेळी सदर रकमेची मागणी केली असता त्यांनी सदर रक्कम आज देतो उद्या देतो असे म्हणत असे सदर खातेदार यांची रक्कम परत न केल्यामुळे खातेदार यांनी बॅंकेच्या विरुद्ध व बॅंकेचे चेअरमन संतोष बसंता भंडारी यांच्याविरुद्ध माननीय दिवाणी व फौजदारी न्यायालय गेवराई येथे कि.फौ. अर्ज १८२/२०२५ भागुजी विरुद्ध संतोष भारतीय नागरिक सुरक्षा संहितेचे कलम 175(3) नुसार अर्ज दाखल केला होता तसेच आरोपीच्या विरुद्ध भारतीय न्याय सहिता चे कलम 61(2),316(2),316(5),318(4) या कलमानुसार गुन्हा नोंद करण्याकरिता सदर अर्जावर ॲड.एस.एस.काळे साहेबांनी प्रभावी युक्तिवाद केला असता मे. न्यायालयाने अर्जाची दखल घेत त्यावर गेवराई पोलीस स्टेशन यांना वरील कलमान्यवे गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले

यावेळी फिर्यादीच्या वतीने ॲड. शरद. काळे यांनी बाजु मांडली त्यांना ॲड.ए.बी.पौळ व ॲड.आयाज नवाज शेख यांनी सहकार्य केले.

# 'हर घर नर्स घर घर नर्स' या मोहिमे अंतर्गत नौकऱ्या उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करणार : अनिल जायभाये

मुंबई : AIIMS, DMER, DHS शासकीय रुग्णालय, निमशासकीय रुग्णालय, खाजगी रुग्णालय सेवाभावी संस्था रुग्णालय, वयोवृद्ध आश्रम, ओल्ड एज होम, बेबी केयर सेंटर, होम केयर सर्व्हिस, ॲम्ब्युलन्स, व्यसनमुक्ती सेंटर, महानगरपालिका, नगरपरिषद, पंचायत समित्या, राष्ट्रीय टोल नाके, सर्व अंगणवाड्या, इंग्रजी माध्यमांच्या शाळा, मराठी माध्यमांच्या शाळा, आदिवासी शाळा, कनिष्ठ/उच्च महाविद्यालय, विद्यापीठ, बॅंक, मॉल, डि मार्ट, रेल्वे/ मेट्रो, सर्वच प्रकारच्या शासकीय/खाजगी कार्यालयात, शैक्षणिक संस्था मध्ये, विमान सेवा मध्ये, परदेशामध्ये वेगवेगळ्या MIDC/ IIT/INDUSTRIAL कंपन्या मध्ये, वर्दळीचे सर्व ठिकाणे, सुप्रीम कोर्टाच्या आदेशानुसार ज्या ठिकाणी 50 पेक्षा जास्त व्यक्ती समूह एकत्र येतात त्या प्रत्येक ठिकाणी परिचारिका बंधु भगिनींना सन्मान पुर्वक वेतन देऊन रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणार आहे.

वरील संकल्पनेतून भारतातील विशेषत : महाराष्ट्रातील 10 लाख नर्सिंग स्टाफ यांना सन्मानपूर्वक रोजगार उपलब्ध करून देण्याचा मानस आहे. तरी सर्वांनी या सुवर्ण संधीचा लाभ घ्यावा. ज्या नर्सिंग विद्यार्थ्यांनी इंडियन



नर्सिंग कौन्सिल INC महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिल MNC आणि महाराष्ट्र राज्य सुश्रुषा व पॅरा वैद्यकीय शिक्षण मंडळ, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक आणि महाराष्ट्र राज्य शासन मान्यता प्राप्त महाविद्यालयातून परिचर्या शिक्षण व नोंदणी पुर्ण केलेली असून खालील डिप्लोमा, डिग्री धारक नर्सिंग विद्यार्थ्यांनी नर्सिंग स्टाफ यांनी ANM, GNM, PBSC, BSC, MSC, NSG ICN, NSG PHD, NSG, MBA, NSG BBA, HOSPITAL, MANAGMENT पीडियाट्रिक नर्सिंग, ऑर्थोपेडिक नर्सिंग, Psy-chiatric नर्सिंग अश्या सर्वांनी या संधीचा लाभ घ्यावा तसेच बोगस नर्सिंग महाविद्यालयापासून सावधान राहावे असे आवाहन अनिल जायभाये बीडकर यांनी केले असून 9011772189 या नंबरवर संपर्क करण्याचे आवाहन केले आहे.

# फार्मसी: भविष्यातील अग्रणी नामांकित करिअरची संधी' -प्रा डॉ निखिल जाधव

● पान १ वरून ... नवनवीन विकसित होत गेले. डॉक्टर रोगनिदान व उपचारांत तज्ज्ञ, तर फार्मासिस्ट हा औषधतज्ज्ञ त्यामळे फार्मासिस्टची रूणाभिमख भूमिका विकसित व विस्तारीत होत गेली. जागतिक आरोग्य संघटनेनेही या भूमिकेवर शिक्कामोर्तच केले. फार्मासिस्ट हा डॉक्टरांना पुरक व आरोग्य सेवेतील महत्वाचा घटक झाला. बहुतांशी देशांत आज फार्मासिस्ट ओषध व आरोग्याविषयक समुपदेशन, प्रिस्क्रिप्शनची पडताळणी, दूष्परिणाम व औषध आंतरक्रिया टाळण्यासाठी रुणांना/ डॉक्टरांना सल्लामसलत करतात तसेच रक्तशर्करा, रक्तदाबसारख्या तपासण्या अशा अनेकविविध सेवा रूणांना देत आहेत. विशेष प्रशिक्षित फार्मासिस्ट तर औषधे लिहून देण्याचे किंवा कन्सल्टिंग करण्याचे काम करत आहेत. एकंदर फामासिस्ट हा पेंशट व डॉक्टर यांच्यातील दुवा आहे.

बाजारपेठेत एक लाखावर ब्रॅंडस आहेत ज्यात नावे सारखी, पण ओषधी द्रव्य मात्र वेगळे, गुणपण वेगळे त्यामुळे अत्यंत जबाबदारीने प्रिस्क्रिपनप्रमाणे औषध देणे गरजेचे असते या वस्तुस्थितीचा विचार केल्यावर फार्मासिस्टच्या भूमिकेची आवश्यकता आणि गरज अधिक लक्षात येईल.

**फार्मसीच्या शिक्षण शाखा :** फार्मसिमध्ये शिक्षण घ्यायचे असतील तर पुढील अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. डी फार्मसी ( पदविका ), बी फार्मसी ( पदवी ), एम फार्मसी ( पदव्युत्तर पदवी ) फार्मा डी

**गुरुकृपा इन्स्टिटयूट ऑफ फार्मसिमध्ये प्रवेश का घ्यावा?**
या महाविद्यालयात डी फार्मसी, बी फार्मसी, एम फार्मसी हा अभ्यासक्रम उपलब्ध आहे ज्यामध्ये प्रवेश घेतल्यानंतर फार्मसी करिअरच्या उत्तमोत्तम संधी उपलब्ध होतात. तसेच येथे विद्यार्थ्यांची कौशल्य वाढवीत म्हणून पारंपरिक अभ्यासक्रमा बाहेर जाऊन 'हॅण्डस ऑन ट्रेनिंग' दिले जाते गत वर्षी विद्यार्थांना हर्बल प्रॉडक्ट्स कसे बनवायचे याचे प्रशिक्षण दिले जाते. आता पर्यंत विद्यार्थ्यांनी च्यवनप्राश, त्रिफळा चूर्ण, त्रिफळा टॅबलेट, गुगुळ टॅबलेट, महानारायणी तेल, सुगंधी उठणे, नीम साबण, चंदन साबण, गुलाब साबण बनवले आहेत. विद्यार्थींचे विक्री कौशल्य वाढावे म्हणून कमवा व शिका योजने अंतर्गत विद्यार्थिनी हर्बल प्रॉडक्स ची विक्री केली आहे. विद्यार्नसाठी जॉब प्लेसमेंटचे आयोजनही केले जाते. बरेच विद्यार्थ्यांची स्वत:चे मेडिकल स्टोअर्स आहेत त्याचबरोबर विद्यार्थी औषधी कंपनीच्या मार्केटिंग डिपार्टमेंट मध्ये, प्रोडक्शन, क्वालिट कंट्रोल डिपार्टमेंट, मेडिकल कोडिंग आणि फार्माकोविजिलन्स मध्ये नौकरी करत आहेत. येथे विशेष बाब निदर्शनास आणून द्यावी वाटते की या महाविद्यालयतील माजी विद्यार्थी आकाश बडे यांनी स्वत:ची फार्मा कंपनी स्थापन केली आहे आणि त्याची वाटचाल यशस्वीरीत्या सुरू आहे.

**-प्रा. डॉ. निखिल निळकंठ जाधव**
(प्राध्यापक, गुरुकृपा इन्स्टिट्युट ऑफ फार्मसी)
मेंबर ऑफ वर्ल्ड ह्युमन राईट प्रोटेक्शन कमिशन.

# विद्यार्थ्यांना शालेय साहित्यासह गणवेश तात्काळ वाटप करा -भागवत दराडे

माजलगाव / प्रतिनिधी :
नुकतेच शैक्षणिक वर्ष सुरू झाले असून जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांचा ओढा वाढवण्यासाठी विद्यार्थ्यांना गणवेश व शालेय साहित्याचे वाटप तात्काळ करण्याची मागणी सरपंच भागवत दराडे यांनी केली आहे.

धारूर तालुक्यातील जिल्हा परिषद शाळेत शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना जिल्हा परिषद शाळेकडे आकर्षित करण्यासाठी गणवेश व शालेय साहित्याचे वाटप तात्काळ करण्यात यावे, शासनाकडून देण्यात येणाऱ्या विविध योजनांचा लाभ विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचला पाहिजे यासाठी शाळेने पुढे येणे आवश्यक आहे. याबाबत धारूर गटशिक्षण अधिकाऱ्यांना जैतापूरचे सरपंच भागवत दराडे यांनी मंगळवारी निवेदन देत मागणी केली. इंग्रजी शाळांकडे विद्यार्थ्यांचा वाढता कल रोखायचा



असेल तर जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांनी सतर्क होत विद्यार्थ्यांच्या भौतिक व शैक्षणिक गरजा पुरवणे आवश्यक असल्याचे भागवत दराडे यांनी माध्यमांना बोलताना सांगितले. भागवत गव्हाणे, धूनकवड, अविनाश कांदे, जहागीर मोहा, राहुल तोंडे सोनीमोहा सरपंच आदी सरपंच मंडळी याप्रसंगी गट शिक्षण अधिकारी कार्यालयात उपस्थित होती.

# गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार, पाणी फिल्टरचे उद्घाटन

## दिंद्रुडच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाची आता डॉ. सोनाजीराव रांजवण माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय म्हणून ओळख

माजलगाव / प्रतिनिधी :
तालुक्यातील दिंद्रुड येथील माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये नामकरण डॉ.सोनाजीराव रांजवण नुकतेच करण्यात आले.या प्रसंगी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व पाणी फिल्टर योजनेचा शुभारंभ कार्यक्रम संपन्न झाला. सिंदफना शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष शिवाजी रांजवन यांची प्रमुख उपस्थिती होती.

शाळेचे मुख्याध्यापक प्राचार्य गणेश उजगरे, पर्यवेक्षक पी.जी लखमावाड आदी मान्यवर उपस्थित होते. सन २०२४-२५ इयत्ता दहावी व बारावी, नीट परीक्षा मध्ये चांगले गुण मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार यावेळी करण्यात आला. भागवत युवराज दिगंबर, सय्यद महेक अकिल, ठोंबरे ज्ञानेश्वर सुदाम, मते वेदिका



रघुनाथ, शिरसे प्रतिभा चंद्रकांत, साळुंखे साक्षी कैलास, गव्हाणे प्रतीक अरुण, मुंडे सीता मधुकर, मायकर अजिंक्य गणेश, मुंडे निकिता सुधाकर, ठोंबरे योगिनी युवराज, कोथिंबीर ऐश्वर्या वैजनाथ, कोथिंबीर अनिकेत ज्ञानेश्वर या विद्यार्थ्यांचा पालकासह शाल, श्रीफळ, पुष्पहार, गुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी गावातील पालक दत्ता शिंदे, नवनाथ ठोंबरे, शिवहार कटारे, गणेश ठोकरे, सुदाम ठोंबरे, मस्के मुंडे, कोथिंबीरे सह एस.एस बारावकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अध्यक्ष शिवाजी रांजवन यांनी कै. डॉ. सोनाजीराव रांजवण साहेबांच्या शैक्षणिक कामाचा आढावा सांगितला व विद्यार्थ्यांमधील कौशल्य ओळखून पालकांनी खर्च न करता चांगले शिक्षण द्यावे अशी आवाहन केले, कार्यक्रमाचे अध्यक्ष जी.व्ही उजगरे यांनी अहवाल वाचन व अध्यक्षीय समारंभातून विद्यार्थ्यांना अनमोल मार्गदर्शन केले, आभार संस्कृतीक विभाग प्रमुख के.बी भोसले यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी सहकार्य केले व कार्यक्रम यशस्वी पार पाडला.

# भारताच्या हायपरसोनिक ग्लाईड क्षेपणास्त्राच्या चाचण्या प्रगतीपथावर

नवी दिल्ली : 'ऑपरेशन सिंदूर'च्या निमित्ताने भारतीय सैन्याच्या प्रगत तंत्रज्ञानाची पाकिस्तान विरोधात यशस्वी चाचणी झाली. संपूर्ण जग या चाचणीचे साक्षीदार झाले. भारताने १०० तासांच्या हवाई युद्धात पाकिस्तानवर सरशी साधली. पाकिस्तानच्या हवाई संरक्षण यंत्रणेचे नुकसान झाले. या कारवाईची जगाने दखल घेतली. पाठोपाठ डीआरडीओ विकसित करत असलेल्या भारताच्या हायपरसॉनिक ग्लाईड क्षेपणास्त्राबाबतचे वृत्त आले आहे. भारताच्या हायपरसॉनिक ग्लाईड क्षेपणास्त्राच्या चाचण्या प्रगतीपथावर आहेत. डीआरडीओने याबाबत प्रसारमाध्यमांना माहिती दिली आहे. हायपरसोनिक म्हणजे आवाजाच्या वेगापेक्षा पाचपट जास्त वेग. या प्रचंड वेगाने उडण्यास सक्षम असलेल्या क्षेपणास्त्राचे वैशिष्ट्य म्हणजे ते प्रक्षेपित केल्यानंतर लक्ष्याचा मार्ग शोधत आवश्यकतेनुसार ग्लाईड करत स्वत:च्या मार्गात बदल करण्यास सक्षम आहे. भारत विकसित करत असलेले हायपरसोनिक ग्लाईड क्षेपणास्त्र प्रक्षेपित करण्यास सोपे आहे. शत्रूच्या अनेक प्रकारच्या हवाई संरक्षण यंत्रणेला भेदू शकते. भारताने ओडिशाच्या किनाऱ्यावरील एपीजे अब्दुल कलाम



बेटावरून लांब पल्ल्याच्या हायपरसोनिक क्षेपणास्त्राची एक चाचणी काही महिन्यांपूर्वी घेतली आहे. क्षेपणास्त्रात आणखी बदल करुन ते अधिकाधिक प्रभावी आणि संहारक करण्याचे काम सुरू आहे. भारताने हायपरसोनिक ग्लाईड क्षेपणास्त्रासाठी स्वदेशी इंजिन विकसित केले आहे. या इंजिनच्या मदतीने क्षेपणास्त्र वेगाने लक्ष्यावर हल्ला करण्यास सक्षम आहे. भारताने विकसित केलेले क्षेपणास्त्रासाठीचे इंजिन वेगवेगळ्या आव्हानांना सामोरे जात सलग एक हजार सेकंद कार्यरत राहते हे चाचणीतून सिद्ध झाले आहे. यामुळे क्षेपणास्त्र अधिक प्रभावी करण्यास मदत झाल्याचे डीआरडीओने सांगितले.

# पणन विषयक कार्यशाळेचे उपसभापती श्रीहरी मोरे यांच्या हस्ते उदघाटन

माजलगाव : महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ पुणे व राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था ( NIPHT ) तळेगाव दाभाडे जि. पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १९ जुन २०२५ रोजी जिल्ह्यातील कृषि उत्पन्न बाजार समितीचे सभापती, उपसभापती, संचालक मंडळ व सचिव यांचेसाठी पणन विषयक एक दिवसीय कार्यशाळेचे उदघाटन उपसभापती श्रीहरी मोरे यांच्या हस्ते करण्यात आले.


यावेळी माजलगाव बाजार समितीचे संचालक भगवान आगे, अमोल जाधव, नंदकुमार सजगने, आबाजी भोसले, सचिव एच.एन. सवने, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी सुभाष साळवे, उपनिबंधक सचिन घोडके, उपसरव्यवस्थापक महादेव बरडे, गोपालकृष्ण परदेशी उपस्थित होते. राज्यातील बहुतांश बाजार समितीच्या निवडणुका नुकत्याच पार पडलेल्या असल्याने नवीन संचालक मंडळ



कार्यरत झालेले आहे. कार्यशाळेच्या सुरुवातीला मंत्री जयकुमार रावल यांचा नुतन संचालकांसाठी शुभसंदेश भाषणाची क्लीप सर्व उपस्थितांसमोर प्रसारित करण्यात आली. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी सुभाष साळवे यांनी बाजार समितीच्या कार्यक्षेत्रातील कृषी उत्पादने व नियमन, गोपालकृष्ण परदेशी यांनी कलम ३७ अन्वये बाजार समिती फीचा उपयोग व बाजार समितीवर आव्हाने आणि उपाययोजना, सचिन घोडके यांनी बाजार समितीचे गुणक्रमांक पध्दती, महादेव बरडे यांनी कृषि पणन विषयक विविध योजना या विषयांवर उपस्थित पदाधिका-यांना सखोल मार्गदर्शन केले.

कार्यशाळेत समृत जाधव यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. कार्यशाळेसाठी महादेव बरडे, तळेगाव दाभाडे येथील अधिकारी राजेश नाफडे, अजय नागवडे, बाजीराव दगडे यांनी परिश्रम घेतले.

# महा जम्बो शब्दकोडे



### आडवी विधाने

१. देव आनंद, साधना यांचा सुपरहिट चित्रपट
५. मेलेला, ठार
७. मेळ, जुळणी
९. नोकर, सेवक
१०. गळ्यामागील भाग, सत्कार
११. एक हजार किलोचे वजन
१२. राजेश खन्ना, रेखा, राज बब्बर यांचा चित्रपट
१६. शशी कपूर, आशा पारेख यांचा चित्रपट
१८. पोपट, कीर, राघू
२०. सहा धावांचा क्रिकेटमधील फटका
२२. कुबेराचा सेवक
२३. वजनदार
२४. कापरे, थरथर
२५. भारलेला, ताब्यात आलेला
२७. दुर्दशा, वाईट अवस्था
२८. संजय दत्तची प्रभावी भूमिका असलेला चित्रपट
२९. मूषक
३०. किल्ल्याभोवतीची मजबूत भिंत
३१. दानशूर, मोठ्या मनाचा
३३. लाकूड कापण्याचे हत्यार
३५. नूतन, नवा
३६. तलवार
३८. कर, हस्त
४१. अभिप्राय
४३. अंगावरील बारीक मऊ केस
४५. खानेसुमारी, शिरगणती
४६. अज, बकरा
४८. शेंगेचे कवच
५०. धरित्री, पृथ्वी
५२. एका पक्ष्याचे नाव
५४. बाण, शर
५५. नाडी, शीर, धमनी
५७. अजगर
५८. पर्वत; जिन्नस
५९. इटलीची राजधानी
६१. सौभाग्यवतीचे संक्षिप्त रूप
६२. मंडप
६३. वडीलभाऊ; विनोद मेहराचा चित्रपट
६४. कोषाध्यक्ष
६७. दु:ख, वेदना
६८. झाड, वृक्ष
६९. बकऱ्याचे कमावलेले कातडे
७१. युद्ध, रण
७३. दोरी, दोर
७५. सफेद, पांढरा
७७. जमिनीवर अंथरण्याचे जाडजूड बिछाईत
८०. लोणी
८१. अवहेलना, मानखंडना
८२. धर्मेंद्र-जीतेंद्र जोडीचा हिट चित्रपट

### उभी विधाने

१. उत्तर कुमार, शर्मिला टागोर यांचा चित्रपट
२. वर्ष, साल
३. नाटक-सिनेमात काम करणारा पुरुष
४. सोने, सुवर्ण
५. हरिणाच्या डोळ्यांसारखे डोळे असलेली सुंदर स्त्री
६. होडी, मचवा, नाव
७. मोर्चेबांधणी, एकत्र करणे
८. प्रतिबंध, बंदी (हिंदी)
९. 'शुक्रतारा' हा कार्यक्रम सादर करणारे गायक - अरुण **
१२. अभिनय, नट्टाफट्टा
१३. पक्ष्याच्या डोक्यावरील शेंडी
१४. यज्ञ, यजन
१५. गगन, नभ
१७. योग्य निर्णय, निवाडा
१९. मडक्याचा तुकडा
२१. ताजा, प्रफुल्लित
२४. फाणस, लालटेन
२६. नाराज, निराश
२८. कळलाव्या; ब्रह्मदेवाचा मानसपुत्र
३०. शरीर - अंत:करण-पैसा इत्यादी सर्वस्व
३२. फाशांवरून शकुन पाहण्याची विद्या
३४. तृष्णा
३७. अंत, अखेर, समाप्ती
३९. धट्टाकट्टा, मजबूत, बळकट
४०. श्वापद, पशू
४२. तोटा, हानी
४४. राजेश खन्ना, शर्मिला टागोर, फिरोज खान यांचा चित्रपट
४७. भीती, भय
४९. एक हिंदी अभिनेत्री - **
अग्निहोत्री
५१. गायन म्हणण्याची विशिष्ट धाटणी, शैली
५३. भारताच्या पहिल्या महिला राज्यपाल - **** नायडू
५६. परस्परांपासून सारख्या अंतरावर असलेला
५७. आमंत्रण, बोलावणे
६०. अंत:करण
६५. नोकर, सेवक
६६. अरबी वर्षाचा नववा महिना
६९. नेत्र, डोळे
७०. आर्थिक सामर्थ्य
७२. धुळीचा कण, रेणू
७४. मुस्लिमांचा नमस्कार
७५. पती, मालक, कारभारी
७६. कढवलेले लोणी
७८. मकरंद
७९. पराक्रमी, लढवय्या

### महा जम्बो शब्दकोडे कालचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| व | सं | त | का | ने | ट | क | र | | धु | | टो | क | दा | र |
| सा | ग | र | | म | | स | ई | प | रां | ज | पे | | दा | स |
| | न | | द | | वा | र | स | | डे | रा | | लू | | वं |
| अ | म | री | श | पु | री | | | म | | सं | क | ट | | ती |
| ना | त | | र | त | | चौ | क | शी | | ध | | मा | घ | |
| थ | | र | थ | | मा | का | | द | र | | खा | र | | क |
| | मो | द | | क | ल | र | व | | वा | ट | प | | त | म |
| मे | ह | न | त | | व | | जी | व | न | | र | ख | वा | ला |
| ह | र | | | क | ण | ख | र | | गी | त | | रू | | |
| बू | | स | व | ड | | प | | उ | | ग | र | ज | वं | त |
| ब | र | खा | स्त | | रा | | उ | दा | ह | र | ण | | श | र |
| | त्न | | रा | ज | धा | नी | | स | ल | | जी | व | | बे |
| न | मा | ज | | न्म | | ल | ग्न | | का | | त | र | बे | ज |
| क | ला | का | र | | ना | म | | भी | | अ | | पा | | |
| ली | | त | ग | म | ग | | स | म | ज | दा | र | | शो | ध |

# शहर ठाण्यात 27 तर ग्रामीण ठाण्यात 10 नवीन पोलीस कर्मचारी; आता काम होणार जलदगतीने

## ➤ पिआय सूर्यतळ व पीआय कोळी यांच्या पाठपुराव्याला यश

माजलगाव / अरविंद ओव्हाळ : माजलगाव पोलिसात गेल्या अनेक वर्षापासून मंजूर पदांपेक्षा निम्मे कर्मचारी पदे रिक्त असल्याने येथील उपलब्ध पोलिस कर्मचाऱ्यांवर नेहमीच कामाचा अतिरिक्त तापण पाहत असलेला आहे. त्यामुळे पोलिसांचे संख्याबळ वाढवण्यासाठी पीआय व सूर्यतळ व पीआप कोळी यांनी सतत एमपी कावत त्यांच्याकडे पाठपुरावा करून शहर पोलीस ठाण्यात २७ तर ग्रामीण पोलीस ठाण्यात १० नवीन पोलीस कर्मचारी दाखल करून घेण्यात यश मिळवले आहे. चामुळे पोलिसांचे संख्यावळ वाढल्याने त्यांच्यावर पडनारा अतिरिक्त कामाचा ताण कमी होण्यास मदत होनार आहे.



ग्रामीण पोलीस ठाणे



शहर पोलीस ठाणे

माजलगाव शहरासह ग्रामीण भागाचा विस्तार आणि लोकसंख्या झपाट्याने बादत आहे. बाजारपेठा, सरकारी कार्यालय, शाळा कॉलेज, मोठमोठे हॉस्पिटल याठिकाणी उभारल्या जात आहेत. त्यामुळे मोडी आर्थिक उलाढाल या ठिकाणी होत आहे. राजकीय, सामाजिक स्थिती बदलत आहे. त्यामुळे गुन्हांच्या प्रमाणात बाद होत आहे. शहरासह ग्रामीण भागात कायदा आणि सुव्यवस्था राखण्यास मोठी अडचण निर्माण होत आली आहे. तालुक्याची भौगोलिक राजकीय, सामाजिक परिस्थिती लक्षात घेता पुरेशा प्रमाणात पोलिस कर्मचारी असले पाहिजेत. परंतु याठिकाणी अपुऱ्या कर्मचाऱ्यांवर काम भागवल्या जात होते. ज्यामुळे अतिरिक्त कामाचा ताण नेहमीच येतील पोलीस कर्मचाऱ्यांवर पडत आलेला आहे.



राहुल सूर्यतळ, पो. नि., शहर



बालक कोळी, पो. नि., ग्रामीण

माजलगाव शहरासह तालुक्यातील ११६ गावातील नागरिकांचा संपर्क पोलिसांची येतो. शहर पोलिस ठाण्यात अधिकारी व कर्मचाऱ्यांसह एकूण ९० पदे मंजूर आहेत. परंतु याठिकाणी ४५ अधिकारी कर्मचाऱ्यावर कामकाज पाहिले जात होते. तर ग्रामीण पोलीस ठाण्यात ८० पद मंजूर आहेत. याठिकाणी ३९ कर्मचाऱ्यांवर कामकाजपाहिले जात होते. शहर तालुक्याचा वाढता विस्तार लक्षात घेता ही अगदी कमी संख्या आहे होती. अपुऱ्या कर्मचाऱ्यांमुळे पोलिसांची चांगलीच दमछाक होत होती. तसेच प्रत्येक कर्मचाऱ्यावर अतिरिक्त कामाचा ताण पडत होता. यातच कामांची अदलाबदल झाल्यामुळे अधिकारी, कर्मचाऱ्यांना याचा देखील वेगळा मनस्ताप सहन करावा लागतो. त्यामुळे कामगिरीवरही परिणाम होत आहे.

हि बाब लक्षात घेता शहर ठाण्यात रुजू झालेले पो. नि. राहुल सूर्यतळ ग्रामीण ठाण्यात रुजू झालेले बालक कोळी यांनी पोलीस अधीक्षक यांच्या निदर्शनास ही बाब आणून दिली. यासाठी सतत पाठपुरावा केला. याचा परिणाम म्हणून शहर ठाण्यात २७ नवीन पोलीस दाखल झाले आहेत तर ग्रामीण पोलीस ठाण्यात १० पोलीस कर्मचारी दाखल झालेत.

यामुळे पोलिसांचे संख्याबळ तालुक्यात वाढले असून त्यांच्यावर पडणारा अतिरिक्त तानाचा काम कमी होणार आहे.

### शहर पोलिसात कार्यरत अधिकारी कर्मचारी :

● पोलिस निरीक्षक १, सहायक पोलिस निरीक्षक १, पोलिस उपनिरीक्षक २, सहाय्यक पोलिस ७. पोलिस हवालदार २१, पोलिस नाईक ४. पोलिस शिपाई २४, महिला पोलीस ११

### ग्रामीण पोलीस ठाण्यात कार्यरत अधिकारी कर्मचारी :

पोलिस निरीक्षक १, सहायक पोलिस निरीक्षक १. पोलिस उपनिरीक्षक २, सहायक फौजदार ६. पोलिस हेड कॉन्स्टेबल ८. पोलिस नाईक ५. पोलीस शिपाई १४, महिला पोलीस १२

---

विशेष

## सरपंच अवॉर्ड या स्पर्धेत उत्कृष्ट कार्याची दखल घेऊन केला सन्मान





आष्टी : दै. लोकमत सरपंच अवॉर्ड या स्पर्धेत आष्टी तालुक्यातील पांढरी गावचे सरपंच सुधीर पठाडे, सांगवी पाटण गावचे सरपंच दत्तात्रय खोटे, पुंडी गावच्या सरपंच सौ प्रतिभा बाळासाहेब थोरवे, वंजारवाडी, बोरडवाडी गावचे सरपंच संजय महाजन यांनी सहभाग घेतला होता त्यांच्या उत्कृष्ट कार्याची दखल घेऊन दै. लोकमतच्या वतीने त्यांना सन्मानपत्र आष्टी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी गोकुळ बागलाणे व लोकमतचे आष्टी तालुका प्रतिनिधी अविनाश कदम यांच्या हस्ते देण्यात आले यावेळी विस्तार अधिकारी बाळासाहेब जायभाय, ग्रामसेवक आबासाहेब खिलारे, गोवर्धन सायबर, किरण पोठरे, मनोहर सरोदे, सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार समीर शेख, किरण शिनगिरे, लहु शेळके आदी दिसत आहेत.

---

## युवा उद्योजक पै. तय्यब भाई पठाण यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा



आष्टी : युवा उद्योजक पै. तय्यब भाई पठाण यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना युवा नेते गणेश (नाना) शिंदे, नगराध्यक्ष जिया भाई बेग, उद्योजक बंडू तोडकर, सरपंच विठ्ठल राख, विलास गोयकर, महेश गायकवाड, पत्रकार अक्षय विधाते, कोकणे सर, संतोष गोयकर, फिरोज शेख, आसिफ शेख, भागवत तांबे, मुज्जो सय्यद, अशोक कोकणे, आबा पालवे, अनिल पालवे, सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार समीर शेख दिसत आहेत.

---

## एक शिक्षिका त्याही दीर्घ रजेवर!

● पान १ वरून...या शाळेत शिक्षकाची कमतरता आहे त्यात एका शिक्षकाची बदली झाल्यानंतर या शाळेत फक्त चार शिक्षक उरले होते आता त्या शाळेत चार शिक्षक न राहता तीनच शिक्षक आहे हे तीन शिक्षक आठवी ते बारावी विद्यार्थिनींना कसे शिकवतील कारण या शाळेतील एक शिक्षिका शाळा सुरू झाल्यानंतर हजर न होता इतर व्यक्तीच्या हस्ते जिल्हा परिषद बीड यांच्यामार्फत दीर्घ रजेचा अर्ज पाठविला आता ही शिक्षिका गेल्यानंतर विद्यार्थिनीचे शिक्षणाची गैरसोय व भरपूर प्रमाणात नुकसान होणार आहे यात मात्र शंका नाही या शाळेतील मुख्याध्यापकाला संपर्क केले असता त्यांनी सदर शिक्षिकाविरुद्ध कायदेशीर नोटीस जारी केली आणि संबंधी शिक्षिकेला पाच दिवसाच्या आत शाळेत हजर राहण्याचे सांगितले आहे तसेच ही शिक्षिका हजर राहिली नाही तर यांची गैरहजर गृहीत धरून त्यांचा प्रस्ताव वरिष्ठांकडे पाठविण्यात येईल असे या शाळेतील मुख्याध्यापक विष्णू सोळुंके यांनी सांगितले आहे

---

## जेष्ठ स्वातंत्र्य सैनिक तात्यासाहेब पोकळे यांचे निधन



आष्टी : आष्टी पंचायत समितीचे माजी सदस्य जेष्ठ स्वातंत्र्य सैनिक तात्यासाहेब पोकळे (वय ९८) यांचे वृध्दापकाळाने बुधवार दि.१८ जुन रोजी निधन झाले.

त्यांच्यापटीमागे बेलगावचे माजी सरपंच तथा भाजप नेते कल्याण पोकळे हा मुलगा, दोन मुली, सुन, नातवंडे असा मोठा परिवार आहे. यावेळी महसुल प्रशासनाच्या वतीने पुष्पचक्र अर्पण करुन मानवंदना तहसिलदार वैशाली पाटील यांनी दिली.

सामाजिक, राजकीय, शैक्षणिक व धार्मिक क्षेत्रातील मान्यवरांनी श्रध्दांजली अर्पण केली. बेलगाव येथे म्हसोबामळा येथे सकळी ११ वा. अंत्यविधी झाला. यावेळी माजी आ. साहेबराव दरेकर, देविदास धस, राजेंद्र धोंडे, किशोर हंबर्डे, तहसिलदार वैशाली पाटील, जयदत्त धस, नायब तहसीलदार जयदत्त चव्हाण, काकासाहेब शिंदे, भाऊसाहेब लटपटे, श्रीधरपंत सहस्त्रबुद्धे, प्राचार्य डा. सोपान निंबोरे, ॲड. बाबुराव अनारसे, आण्णासाहेब श्रीखंडे, पाथर्डीचे राहुल कारखेले, आण्णासाहेब नाथ, हरिभाऊ मार्केडे, भरत जाधव, चेअरमन बाळासाहेब शिंदे, खंडुदादा जाधव, सुनिल नाथ, गणेश शिंदे, कल्याण काकडे, अमोल शिंदे पत्रकार उत्तम बोडखे, प्रविण पोकळे, विक्रम पोकळे, शिवाजी वाडेकर, दादासाहेब मुटकुळे, मेजर रावसाहेब पोकळे, अशोक पोकळे, सुभाष गणगे, सीताराम पोकळे, बबन करांडे, बाळासाहेब थोरवे, डा. राजेंद्र जरांगे, सरपंच अशोक मुळे, पिनु धनवडे, बन्शीभाऊ पोकळे, संजय पोकळे, प्रा. अमृत पोकळे आदि मान्यवर उपस्थित होते.

---

## कु. आदिती चव्हाण हिचे शालांत प्रमाणपत्र परीक्षेत यश



माजलगाव / प्रतिनिधी : माद्यमिक आश्रम शाळा ता. माजलगाव जिल्हा बीड या शाळेतील विद्यार्थिनी आदिती अंकुश चव्हाण रा. जायकोवडी तांडा ता. माजलगाव हिने शालांत प्रमाणपत्र परीक्षेत ९३.८० टक्के गुण घेत घवघवीत यश मिळवले आहे. फेब्रुवारी / मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या शालांत प्रमाणपत्र परीक्षेमध्ये कु. अदिती अंकुश चव्हाण हिने ९३.८०% गुण मिळविले आहेत.

तिच्या यशाबद्दल मुख्याध्यापक पद्माकर तौर, नितीन ओव्हाळ, यांचेसह सर्व शिक्षक वृंद व मित्र परिवाराच्या वतीने अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

---

## गावठी दारुची चोरटी विक्री, माजलगांव शहर पोलीसांची कारवाई; 50 हजाराचा मुद्देमाल जप्त

माजलगाव / प्रतिनिधी : गोपनिय माहीतीच्या आधारे माजलगांव शहर पोलीसांनी माजलगांव शहरातील गौतमनगर भागात काल रात्री ०९.१५ वाजता छापा मारुन तेथे अवैधरित्या गावठी हातभट्टीची चोरटी विक्री करणारी महीला नामे निर्मला भागवत मेंडके रा. गौतमनगर माजलगांव हीचे ताब्यातुन गावळी हातभट्टीची ६० लिटर तयार दारु तसेच गावठी दारु तयार करण्यासाठी उपयोगात येणारे २५० लिटर रसायण, तसेच दारु व रसायण ठेवण्यासाठी वापरात असलेले प्लास्टीकचे व लोखंडी ड्रम असा एकुण ५०,५००/- रुपयाचा मुद्देमाल जप्त करुन नमुद महलेविरुध्द गु.र.नं. २२९/२०२५ कलम ६५ (ई), (फ) महाराष्ट्र दारुबंदी कायद्यान्वये कारवाई करण्यात आली आहे.

सदरची कारवाई नवनीत कॉंवत, पोलीस अधीक्षक बीड, श्रीमती चेतना तिडके, अप्पर पोलीस अधीक्षक अंबाजोगाई, यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ, सहा. पोलीस निरीक्षक प्रल्हाद मुंडे, पोहेकॉ गणेश नांगरे, माधव तोटेवाड, पोलीस अंमलदार महादेव बहीरवाळ, महीला पोलीस अंमलदार रवीना जाधव यांनी केली आहे.



---

## श्रीक्षेत्र पैठण येथुन पंढरपूरकडे निघालेल्या नाथांच्या पालखीवर एक क्विंटल फुलांची पुष्पवृष्टी





पैठण : सर्जेराव खडसन

आषाढी एकादशी निमित्त श्रीक्षेत्र पैठण येथुन पंढरपूरकडे जाणाऱ्या शांती ब्रह्म संत एकनाथ महाराज यांच्या दिंडीला तिसऱ्या क्रमांकाची मान आहे. ही मानाची दिंडी आज दि. (१८) रोजी १२ वाजेच्या सुमारास आतील नाथ मंदिर (नाथ महाराजांचा राहता वाडा) येथिल किर्तन संपवून वाजत गाजत हरिनामाच्या गजरात नाथांच्या पवित्र पादुकांची पालखी समाधी मंदिराकडे निघाली. तद्नंतर ही पालखी कावळे गल्ली मार्गे उदासी महाराज मठ शेजारील पारंपरिक पायऱ्या वरून खाली उतरल्यानंतर पालखीच्या पुढे भालदार, चोपदार, दोन अश्व आणि हजारो भाविक भक्तांच्या व वारकऱ्यांच्या उपस्थितीत ही पालखी गागा भट्ट चौकातील पालखी ओट्या जवळ येताच प्रतिष्ठान महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी पावली खेळून नाथांच्या पालखीवर एक क्विंटल फुलांची उधळण करन्यात आली.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष रविंद्र पा. शिसोदे, सचिव राजेंद्र पा. शिसोदे, प्राचार्य डॉ. शिवानंद सोनकांबळे, यांच्यासह दिनेश पारिख, नानक वेदी, प्रसाद खिस्ती, राहूल पगारे, योगेश जोशी, अनिल जाधव यांची उपस्थिती होती. तर सदर रिंगण सोहळा यशस्वी करण्यासाठी डॉ. हंसराज जाधव, डॉ. अर्जुन मोरे, डॉ. वसंत झैडे, डॉ. सुभाष राठोड, डॉ. रमाकांत तिडके, डॉ. मनिषा काळे, डॉ. संगिता शिंदे, डॉ. सुवर्णा पाटील, डॉ. शोभा मद्रेवार, डॉ. ममताराम करे, डॉ. विजय वैराटे, इत्यादीनी परिश्रम घेतले.

पालखी सोहळ्यासाठी आरोग्य पथक सज्ज

आषाढी एकादशी निमित्त पांडूरंगाच्या दर्शनाची आस उरात घेऊन पायी दिंडीच्या माध्यमातुन आलेले हजारो भाविक भक्त व वारकरी हरिनामाचा गजर करत सावळ्या विठ्ठलाच्या भक्ती रसात न्हाऊन श्रीक्षेत्र पैठण येथून पंढरपूरच्या दिशेने आज मार्गस्थ झाले आहे.

या पायी दिंडीमध्ये सामील झालेल्या वारकरी व भाविकांना पालखी मार्गात औषध, शुध्द पाणी पुरवठा, तसेच त्यांना आरोग्य विषयक जनजागृती इतर सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी पिंपळवाडी प्राथमिक आरोग्य केंद्रातील आरोग्य पथक तैनात करण्यात आले आहे.

यामधे आरोग्य सहाय्यक सुभाष थोरात, आरोग्य सेवक राजु घोरपडे, सचिन मुंगीबल्लाळ, योगेश पवार, शिवाजी कदम इत्यादी आरोग्य कर्मचाऱ्यांचा समावेश करण्यात आला आहे. पैठण ते पंढरपूर पायी दिंडी सोबत जाणाऱ्या वैद्यकीय कर्मचाऱ्यांना वैद्यकीय अधिकारी डॉ. गणेश मैंदड, डॉ रुपाली गायकवाड, अप्पासाहेब पवार, बाळासाहेब आव्हाड लक्ष्मण बोबडे, सविता जाधव, रोहीनी काजळे यांनी शुभेच्छा दिल्या.

---

**दैदिप्यमान सोहळा** ➤ संत तुकाराम महाराज पालखी प्रस्थान सोहळ्याच्या मन:पूर्वक शुभेच्छा!!

# पूर्वजांच्या पुण्याईमुळे तुकोबांची सेवा करण्याचं भाग्य!



दरवर्षी संत तुकाराम महाराजांचा पालखी प्रस्थान सोहळा उत्साहात साजरा होतो. पण पालखी प्रस्थान दिवशी पादुका उचलण्याचा मान आम्हा गंगामसलेकरांना पूर्वजांच्या पुण्याईमुळे मिळाला. देहू पासून पंढरपूरला जाई पर्यंत आणि पंढरपूर पासून देहू पर्यंत पोहचे पर्यंत पादुकांची जबाबदारी गावकऱ्यांची असते. डोक्यावर पादुका घेऊन इनामदार वाड्यात नेल्या जातात तिथून पुढे हा दैदिप्यमान सोहळा सुरू होतो.

हा मान का मिळाला आणि आताच्या पिढीतील लोकांना तो मान कसा दिला जातो हा प्रश्न साहजिकच आहे. निजामशाहीच्या काळात वारी पूर्णत्वास नेण्यासाठी कोणी पुढे येत नव्हतं तेव्हा गंगामसल्याच्या जुन्या लोकांनी डोकं न झुकवता तुकाराम महाराजांच्या पादुका डोक्यावर घेऊन वारी पूर्ण केली. ही कृती केवळ भक्ती नव्हे, तर धाडस, निष्ठा, आणि परंपरेचे रक्षण यांचं प्रतीक होती. काही झालं तरी "वारी चुकायाची नाही" हा दृढ संकल्प होता.

त्यामुळेच पुढे पादुका उचलण्याचा विशेष मान संत परंपरेतील मान्यतेने गावाला देण्यात आला. या परंपरेमुळे गावाला वारीच्या आध्यात्मिक इतिहासात एक अद्वितीय स्थान मिळाले आहे.

पूर्वजांच्या पुण्याईने मिळालेला हा मान आज पुढची पिढी मोठ्या श्रद्धेने सेवा करून टिकवत आहे. ज्यांनी कोणी तुकोबांच्या पालखी सोबत दहा वर्षे देहू-पंढरपूर चालत पायी वारी पूर्ण केली त्यांना आता हा पादुका उचलण्याचा मान मिळतो. गावात असलेल्या चार मुंडांपैकी दरवर्षी एका मुंडामध्ये हा मान दिला जातो. आणि पादुकांची सेवा करण्याची संधी पूर्ण गावाला दिली जाते.



आजही जेव्हा आमच्या लोकांच्या हातून पादुका उचलल्या जातात, तेव्हा गावाचा इतिहास आणि अभिमान डोळ्यांसमोर उभा राहतो. – मानाचे सेवेकरी मानकरी..

– सोन्या एस. सोळंके.
मोबाईल नंबर : 087880 50768
गंगामसला, जिल्हा बीड.